# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महानगरपालिका हॉट मिक्स प्लॉन्ट करीता नागपूर शहरातील रस्त्याची
**{हॉट मिक्स प्लॉन्ट विभाग}** दुरुस्तीची व सुस्थिती व तसेच डांबरीकरणाच्या कामासाठी मे. हिंदुस्थान पेट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड (H.P.C.L)/ मे.भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड (B.P.C.L) या राष्ट्रीयकृत कंपनी कडून अग्रिमव्दारे रु.१,४९,५७,५६२/- राशीचे डांबर करीता पद क्र.७९५(A८२०१४९०६०१) अंतर्गत खरेदी करण्याचे प्रस्तावास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा तदनंतर मे.हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड / मे.भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांचेकडून डांबर टप्याटप्याने खरेदी करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

१) हॉट मिक्स प्लॉन्ट विभागातर्फे नागपूर शहरातील १२ मिटरपेक्षा अधिक रुंदीच्या मुख्य रस्तावरील खड्डे व कट्टस दुरुस्ती काम व तसेच विविध प्रभागातील रस्त्याचे डांबरीकरणाची कामे करावयाची असुन या कामाकरीता डांबर खरेदीची आवश्यकता आहे.
२) या कामाकरीता लागणारे डांबर खरेदीचे काम करण्याकरीता तयार केलेले प्राकलन मे.हिंदुस्थान पेट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड या राष्ट्रीयकृत कंपनीच्या दि.२३.०२.२०२३ रोजीच्या प्रोफारमा इन्व्हाईस वर अधारीत आहे.
३) उपरोक्त प्रस्तावास मंजुरी प्राप्त झाल्यानंतर मे मे.हिंदुस्थान पेट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड (H.P.C.L)/ मे.भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड ( B.P.C.L) या राष्ट्रीयकृत कंपनी कडुन डांबर टप्याटप्याने खरेदी करण्यात येईल.
४) सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 310/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 15/03/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, हॉट मिक्स प्लॉन्ट विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महानगरपालिका हॉट मिक्स प्लॉन्ट करीता नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्तीची व सुस्थिती व तसेच डांबरीकरणाच्या कामासाठी मे. हिंदुस्थान पेट्रोलीयम कार्पोरेशन लिमिटेड (H.P.C.L)/ मे.भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड (B.P.C.L) या राष्ट्रीयकृत कंपनी कडून अग्रिमव्दारे रु.१,४९,५७,५६२/- राशीचे डांबर करीता पद क्र.७९५(A८२०१४९०६०१) अंतर्गत खरेदी करण्याचे प्रस्तावास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा तदनंतर मे.हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड / मे.भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड यांचेकडून डांबर टप्याटप्याने खरेदी करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**